॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥

# लहरी भजनावली

## मराठी

卐

रचियता

संत श्री जैरामदास उर्फ लहरीबाबा

कामठा

किमत ५-०० रुपये

॥ श्री गुरुदेव प्रसन्न ॥

# लहरी भजनावली

## मराठी

( जुनी आवृत्ती वरून )

卐

रचियता


संत जैरामदास उर्फ लहरीबाबा
कामठा


किंमत ५-०० रुपये

प्रकाशक :
संत श्री जैरामदास उर्फ लहरी बाबा
प्रबंधक, लहरी आश्रम कामठा.
त. गोंदिया जि. भंडारा (महाराष्ट्र)

पुस्तक मिळण्याचे ठिकाण :
श्री लहरी आश्रम कामठा.
त. गोंदिया जि. भंडारा

जुनी आवृती वरुन पुर्न मुद्रित २००० प्रति
दिनांक ३० नोव्हेंबर १९९८

सर्वाधिकार प्रकाशकाचे स्वाधीन.

किमत ५-०० रुपये

卐
मुद्रक :
नव दुर्गा प्रिंटींग प्रेस,
राम मंदीर वार्ड, भंडारा-४४१९०४
फोन नं. ५४४३०

# दोन शब्द

पाहुनी जग भुलले भौतिक वादात ।
म्हणून कासाविस जीव झाला ।।
विनवितो पांडुरंगा, उचल देवा पड़दा जड ज्ञानाचा ।
दे प्रकाश अध्यात्माचा ।।

आजचे जग हे भौतिकवादात अगदी गुंतून गेलेले आहे. एकमेकावर विजय मिळविण्याची ईर्ष्या वाढली आहे. एकमेकांना पराजीत करण्यासाठी घृणात्मक कृत्य आणि शस्त्रांचा प्रयोग आणि उपयोग होत आहे. परंतु ह्या पासून जगांत अशांतिच वाढत आहे. व सर्व विश्वातील मानव जातच भयानक शंकेत पछाड-लेली आहे. क्षणिक सुख, मोहमाया, अहंकार, यांच्या पाशात अडकून माणसाला माणुसकीचा विसर पडत चालला आहे. आकस्मिक घटना अल्पायुष्य व यमयातना देणारे आजार ह्यांचा पदोपदी अनुभव येत असूनही तो परमेश्वराचे अस्तित्व माना-वयास व त्याच्या चरणी लीन होण्यास तयार नाही. आणि स्वत:च स्वत:साठी दु:खाचे डोंगर रचित आहे.

जगांत सुख शांति व रामराज्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर, आध्यात्मिक ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. ह्या-शिवाय कोणतीही शक्ति, कोणतेही शस्त्र परिणामकारक ठरणार नाही. भारत हा आध्यात्मवादाची गुरुकिल्ली आहे. तर भारतीयच ह्या ज्ञानापासून दूर जात आहेत

येथील महात्म्यांनीच, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध व निरनिराळ्या रचना जनतेला सन्मार्गात आणण्या करिता केलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या वचना प्रमाणें, चालणे आमचे तरी मुख्य कर्तव्य आहे मी ही सरळ भाषेत काही भजने, त्याच उद्देश्याने तयार केलेली आहेत. भजनांचे गायन करून त्याचा अर्थ आत्मसात करून घ्यावा म्हणजे मी कृतज्ञ झालो.

- जैरामदास

# 卐 अनुक्रमणिका 卐


| अ. नं. | भजन | पृ. नं. |
| --- | --- | --- |
| १ | यावे यावे श्री गणराज | १ |
| २ | माणुसकीला पहा गड्या | १ |
| ३ | मानव देह मिळाला | २ |
| ४ | मानवा कर्तव्याशी | ३ |
| ५ | मज लागली आहे | ३ |
| ६ | मानवा इतके दिवस | ४ |
| ७ | मानवा कैसी तुमची | ५ |
| ८ | माझे अवगुण ने | ५ |
| ९ | मानवा सोडली तूं | ६ |
| १० | मानसा सोड हिंसेला | ६ |
| ११ | मानव पाहिजे | ७ |
| १२ | देवा तुजविण | ८ |
| १३ | इथे कुणी नाही | ९ |
| १३ | सोडा कू वासना | १० |
| १४ | सोडा कपट | १० |
| १५ | साधु संताचा | ११ |
| १६ | प्रभु माझ्या वा | ११ |
| १७ | प्रारब्धाची गती | १२ |
| १८ | पहा गाई गुरांचे | १३ |
| १९ | या नरदेही येवूनिया | १३ |
| २० | ऐका ऐका गांवकरी | १४ |
| २१ | कितीं दूर तुझे तें | १४ |
| २२ | कां करशी देहाचा | १५ |
| २३ | किती सांगू मना | १५ |
| २४ | कंठ भरुनिया येती | १६ |
| २५ | किती गोड तुझे तें | १७ |

| अ. नं. | भजन | पृ. नं. |
| --- | --- | --- |
| २६ | कोण तोडिल भवपाश | १७ |
| २७ | केंव्हा भेटदेशी तूं | १८ |
| २८ | कसा हरि मजशी | १८ |
| २९ | जगी आहेत सत्तधारी | १९ |
| ३० | जगांत वाढली बेकारी | १९ |
| ३१ | जन तारण्याशी होत | २० |
| ३२ | उठा उठा सज्जन जन | २० |
| ३३ | ऊठा ऊठा सज्जना | २१ |
| ३४ | गड्या मागे पूढे पाहून | २२ |
| ३५ | गरिबाचा वाली तूं | २२ |
| ३६ | गड्या कां तूच हससी | २३ |
| ३७ | आला पंधरा आगष्ट | २४ |
| ३८ | चित्त शुद्ध करोनि | २४ |
| ३९ | चला आईबापा जाऊ | २५ |
| ४० | झोपेमध्ये दिवस कां | २५ |
| ४१ | चला सर्व मिळूनी | २६ |
| ४२ | आईबापा विनवणी | २६ |
| ४३ | असा कसा हरि तूं | २७ |
| ४४ | आईबापा ऐका ही हाक | २८ |
| ४५ | भक्ति त्यागी कुमार्गी लागी | २८ |
| ४६ | भारतभूच्या वासीयांनो | २९ |
| ४७ | खोवली मानवतेची | ३० |
| ४८ | नाही मागणे धन द्रव्याशी | ३० |
| ४९ | असे ज्याचे मनी | |
| | – आरती – | |
| ५० | आरती सद्गुरूनाथा | |

# प्रार्थना गीत

(चाल : सरपे टोपी लाल.)

सद्‌गुरु चरणी मन लावूनी, बसूं एक ध्यानांत ।
विनवु या देवाला ॥

यारे यारे बांधवानो, चला जाऊ भजनास ।
विनवु या देवाला ॥धृ०॥

आलीही सुवर्ण संधी, दैवाने अमुचे हाती, खोवूं नका ।
निष्काम बैसोनिया, पहाण्याची वेळ नाही, पाहूं नका ॥
मग नाही येणार वेळ या, सफल करु जिवनास ॥१॥

माझे माझे करोनिया, मन विषयांत राही, अष्ट प्रहरी ।
मोह मायाच्या पाई, देव आठवत नाही, कोण श्रीहरी ॥
म्हणोनिया दु:ख भोगणे आले हे आम्हांस ॥२॥

वेळ व्यर्थ खोवूनिया, आळसांत राहुनिया, काय पांहसी ।
क्षणोक्षणी आहे, धोका, नाही देहाचा भरवसा काय पाहसो ॥
चल, उठ आता मोक्ष मिळाया, ऐक संत वचनास ॥३॥

संत संग घेवोनिया, करा सत्य कर्तव्याशी, विसरुं नका ।
जैराम सांगे तुम्हा, तेव्हां चुके चौऱ्याशी, विसरुं नका ॥
वीटे वरती आहे उभा बा, माझा पंढरीनाथ जावू त्या गावला ॥४॥

# संत श्री जैरामदास उर्फ लहरीबाबा



आश्रम : कामठा, त. गोंदिया, जि. भंडारा (महाराष्ट्र)
जन्म तारीख– ७।१२।१९२२

# लहरी भजनावली

## (मराठी)

—❀०❀—

### भजन १ ( चाल : नमामी श्री गण. )

यावे यावे श्री गणराज, राखण्या निज भक्तांची लाज ।। धृ ।।

किती पतीत तुम्ही पावन केले, जन उद्धरण्या तुम्ही अवतरले ।
केले दिन दुबळयांचे काज ।।१।।

वक्रतुंड शोभे एक दंत, चतुर्भुज धारी दिव्य अनंत ।
दाता बुद्धीचे महाराज ।।२।।

मूषक वाहन श्रीरायांचे, कानी कुण्डल मुकूट हिऱ्यांचे ।
पायी घुंगरांचा आवाज ।।३।।

रिद्धी सिद्धी तुमच्या सेवेशी, असती तत्पर तवकार्याशी ।
त्रिभुवनी आहे तुमचे राज ।।४।।

अवगुण विकार सर्व हरोनि, जैरामाची हांक घ्या कानी ।
सफल करी अमुचे सगळे काज ।।५।।

### भजन २ ( चाल : कोणीकडे पाहता )

माणुसकीला पहा गड्या, दुर्व्यसनाच्या सोडा पुड्या,
आतातरी जागाना रे ।
गड्याहो अज्ञानानी त्यागाना रे ।।धृ।।

पाप पुण्य सम झाले म्हणोनी, नरदेह मिळाला ।
माणुसकीची ओळख नाही, म्हणोनि धर्म बुडाला ।
दारू गांजा सोडाना, हरिनामी लागाना, आतातरी जागाना रे ।।१।।

गर्भवासी करार केला, तुला विसरणार नाही ।
मोह माया मध्ये भुलला, वाईट संगती पायी ।
कुसंगती सोडाना, सत्य संगी लागाना, आतातरी जागाना रे ।।२।।

दास जैराम म्हणे रे बाबा, संतसंग धराना ।
सत संग धरोनिया, कुमार्गाशी सोडाना ।
नीतिधर्म ओळखाना, तेव्हां होईल तरणा, आतातरी जागाना रे ।।३।।

**भजन ३** ( चाल : कोणीकडे पाहता. )

मानव देह मिळाला, जन्म तुला लाभला,
खोवूं नको या वेळेला ।
गड्या रे जागना कर्तव्याला रे ।।धृ०।।

संतजन सांगताती, हाक घ्या रे ही कानी ।
माणुसकीला सोडोनिया, कां होता अडानी ।
ऐका ऐका संत बोला, करुं नका गलबला,
सांह्य होईल विठ्ठला रे ।।१।।

कित्येकांना ठगवोनिया, दिन दुबळयांना लुटला ।
असा धर्म कुणी शिकविला, मार्ग असा कुठला ।
त्यागा ऐश्या कामाला, लागा हरि नामाला,
जागा संत वचनाला रे ।।२।।

जाती पंथ उच म्हणोनी, गर्वामध्ये थाटले ।
कर्तव्य ते नीच करीती, मी तू पणात बुडले ।
जाळा ऐशा भावनेला, मनी धरा समतेला,
देव देई भेटी तुला रे ।।३।।

जैरामदास म्हणेरे बाबा, जैसे कर्म करेल ।
या लोकी परलोकी त्याला, तैसे फळ मिळेल ।
सांगतो सर्व सज्जनाला, उभारोनी हस्ताला,
गड्यानों खोवूं नका घटकेला ।।४।।

**भजन ४** ( दिसतो हरि हा भोळा. )

मानवा कर्तव्याशी भूलला, रोगाने बेज़ार केला ॥धृ०॥
सोडली पूर्वजांची चाल, करशी मातापित्याचे हाल ।
शाप त्यांचा तुज लागला ॥१॥

नीति भक्तिचा सोडुनि नाद, वाईट मार्गात मानतो आनंद ।
यांत आयुष्य खोवूनि बसला ॥२॥

तू काम न करशी काहीं, थाटाने बसुन राही ।
याने वाढविले खर्चाला ॥३॥

होती इस्टेट ती तूं खोविली, संगत लबाडीची तूं घेतली ।
लुटतोशी तूं गरिबाला ॥४॥

त्या आत्म्याचा शाप तुज लागला, जैराम म्हणे गर्वाने वागला ।
सोडूनी प्रभू नामाला ॥५॥

**भजन ५** ( चाल : बेर भई प्रभु क्यों नही आये. )

मज लागली आहे चिंता, तुझ्या भेटीची भगवंतारे ॥धृ०॥
तूं जगव्यापक पालनकर्ता, दे दर्शन मज तुचि समर्था ।
तुज वाचुनी मज नाही स्थिरता रे ॥ १ ॥

मायेमध्यें भुललो अनंता, चुकलो तुझ्या गावाचा रस्ता ।
मज पडली आहे भ्रमता रे ॥ २ ॥

चहूं दिशी बघतो नेत्र उघडुनी, तरि तू न दिसशी चक्रपाणी ।
प्रभु धावत येई तू आता रे ॥ ३ ॥

कुठे बसला तू त्रिभूवनी, ऐक तू दिनाची गाऱ्हानी ।
घे हाक माझी जगत्राता रे ॥ ४ ॥

तुझे सहस्त्र नेत्र असूनी, मज बघशिल त्या नेत्रांनी ।
ही विनवणी माझी आता रे ॥ ५ ॥

वेद कथूनी तुला पहाती, कथा किर्तनें किती रिझवती ।
मला कळत नाही तुझा अंत रे ।।६।।

जैरामदास म्हणे हे देवा, नकळे तुझ्या भेदाचा ठावा ।
कधी देशी भेट भगवंता रे ।। ७ ।।

**भजन ६** (चाल : दिल मनसे गाऊंगा तेरा भजन)

मानवा इतके दिवस कां? झोपला, उठ आता लाग तू परमार्थ कामाला
ज्याची कमाई, ते उपवासी राही ।
लबाड लोक त्यांच्यावरी, घालती जालशाही ।
या बेकारीने गड्या पाप वाढला ।।१।।

एक करी तन मनाने, मेहनतीचे काम ।
त्याचे कमाई वरी, दहा करती आराम ।
पुरत नाही अन्न, उपवासी राहीला ।।२।।

धर्म नीति सोडून राहती, लोभ अहंकारांत ।
कमाई पेक्षां खर्च वाढला, पैसा नाही घरांत ।
शोक करती रात्रंदिवस, रोग वाढ़ला ।। ३ ।।

जैराम म्हणे दवडूं नको या, सुवर्ण संधिला ।
तेणे होईल आपल्या, भारत भूचा भला ।
ओळखुनि चला आता, मानव धर्माला ।। ४ ।।

**भजन ७** (चाल : रेशमी सलवार.)

मानवा कैसी तुमची रित कथा, लहानपणी मुलांचे लग्न कां करितां
कर्ज काढूनिया, अंती शेतीस विकतां ।
अन्न वस्त्राने व्याकुल होऊन, दारोदारीं भटकतां ।
अन्नाने उपवासी राहता ।। १ ।।

त्यांना शिक्षण न देतां, अज्ञानतेने करीतां नाश ।
स्वार्थ हितांसाठी, तुम्ही ठेवतां नौकरींत ।
जिवन कां गमवितां ॥ २ ॥

तें तरुणपणी रडती, रोगाने बेजार होती ।
कैसी केल्या बापा गती, लग्न वेळी कुठे होती मती ।
हे झाले तुमचे मता ॥ ३ ॥

सोडा ऐसी वाईट चाल, नाही झालं कोणाचं भलं ।
द्यावे शिक्षण मुला मुलीस, तेव्हां लागती सतमार्गास ।
सावधान व्हा आता ॥ ४ ॥

सोडा अज्ञानतेची वाट, सतमार्ग धरी तूं निट ।
जैरामाची विनवणी, तुम्ही घ्यावे सर्व कानी ।
मानवा करितां ॥ ५ ॥

भजन ८ (चाल : ध्यान लगा, वैराग्य जगा.)

माझे अवगुण ने, मला सत्‌गुण दे, पांडूरंगा ।
तुज वांचून मज नाही संग गा ॥धृ॥

षड्‌रिपू हे अडवूनी बसती, हे दावती विषयाची प्रिती ।
तुझ्या नामाची विसर पाडूनी, हे दाविती कूमती ।
तूं धावत यावे, रक्षा करावे ।
कर भव फाशांतून पार गा ॥१॥

पाप वाटेने हे नेवोनी, लावती विषय मोहनी ।
अहंकारांत बुडवोनिया, नेती वाईट चालीनी ।
तूं वांचवी आता, चरणी माथा ।
तूं जगाचा वाली गा ॥२॥

जैरामदास म्हणे प्रभुदेवा, भक्तांचा तूं कैवारी ।
मोह मायेच्या फाशांतूनी, काढ मज तूं हरि ।
ऐक विनवणी यावे चक्रपाणी ।
ठेव माझी कांही लाज गा ॥३॥

**भजन ९** ( चाल : समुदाय प्रार्थनेची. )

मानवा सोडली तूं. गांव उन्नतीची चाल ।
खोविली इमानदारी, झाले तुझे बेहाल ॥ धृ० ॥
दुसऱ्याचे द्रव्यासाठी, सदा राहे तुझे ध्यान ।
लुटोनिया गरिबांना, करशी स्वत:च भलं ॥ १ ॥
गावांतील झगड्याचे, गावांत न करशी न्याय ।
समतेंत फूट टाकून, बनतो तूंच दलाल ॥ २ ॥
एकतेच्या गटाला, बघतोस तू द्वेषाने ।
म्हणोनिया गेले द्रव्य, ग्राम झाले कंगाल ॥ ३ ॥
पूर्वजांचा ठेवी न मान, म्हणे स्वत: गुणवान ।
घे मार्ग तूची निट, सोड वाईट ही चाल ॥ ४ ॥
अशाच कारणांनी, बिमारी जगी वाढली ।
नेत्र उघडोनी बघ तू, आली कठीण वेळ ॥ ५ ॥
द्वेष भावास सोडोनी, समतेने तूच वाग ।
एक दुसऱ्याची सेवा, हिच सत्य घर चाल ॥ ६ ॥
जैरामची विनवणी, लबाड मार्ग सोडा ।
हित तुम्ही आपला साधा, ऐसी न मिळे वेळ ॥७॥

## पोवाडा

**भजन १०** (चाल : माणसा सरळ हो असा.)

माणसा सोड हिंसेला, कपट द्वेषाला ।
छळू नको कोण्या जिवाला ।
यांत नाही निघे तुझा भला ।
कशी नये बुद्धीरे तुजला ।
दजा नको बघ कोण्या जीवाला रे, जी जी ॥ १ ॥

कित्येक लोक ढोलाने डूलती, भजनें करिती ।
भजनाचा अर्थ ना कळती ।
वाटेल तसा दूराचार करती ।
कशी झाली रे याची मती ।
दारु मासांत रमले असती रे, जी जी ॥ २ ॥
जेव्हा ओढी गांजाची पूडी, नशा मग चढी ।
व्यर्थ बडबडी ।
तेव्हा भजनाची यांना गोडी ।
कशी चाल लागली यांना वेडी ।
असे लिहले का कोण्या शास्त्री रे, जी जी ॥३॥
कित्येक गोड गोड बोलून, लोकांस फसवून ।
धन द्रव्य त्यांचे लुटती ।
अन्न वस्त्रांची फजिती करिती ।
स्वतः सावकार बनती ।
अशा कशा यांच्या खोट्या रिती रे, जी जी ॥४॥
विनवितो मी तुम्हा, बांधवाना खोटे काम त्यागाना ।
सत्य कर्मास लागाना ।
तुम्हां मग नाही कुठे उणा ।
कानी घ्या जैरामाची प्रार्थना ।
नाही तर चौऱ्याशी बंधना रे, जी जी ॥५॥

**भजन ११** (चाल : तेरे प्यार का आसरा.)

मानव पाहिजे, निर्मळ मनाचा ।
तेव्हा भेट देती, सखा पंढरीचा ॥धृ०॥
एक तत्त्व दृढभाव हृदयी धरुनी ।
लोभ अहंकाराशी सर्व त्यजूनी ।
जनी व्यवहार करी, सत्य पणाचा ॥१॥

निष्कपटी निर्व्यसनी, निसंग राहूनी ।
परमार्थ करितसे, प्रपंच साधूनी ।
तेव्हां प्रेमी होतो, सर्व जिवाचा ॥२॥

दुःखी जीवा पाहोनि, अश्रु डोळा येतो ।
सेवेसाठी करितसे, स्वदेहाचो माती ।
नाही ज्याचे अंगी भाव, मानपानाचा ॥३॥

संतसंग विण व्यर्थ, वेळ न टाळी ।
प्रभु चिंतनी मन, सदा सर्वकाळी ।
द्वेषभाव सोडूनि, मित्र हा जगाचा ॥४॥

जैरामदास म्हणे ऐसे, भक्तीचे लक्षण ।
चौऱ्याशोच्या घडामोडी, तुटती तक्षण ।
मागे कीर्ति राहि पुढे, द्वार हा मुक्तिचा ॥५॥

**भजन १२** (चाल : हा धर्म लयासी गेला.)

देवा तुजविण आम्ही दुःखी गा, कां अंत तू बघशीं ॥धृ॥
भारत सोडूनी कुठे तू बसला, दीन दुःखीयाची दया नाही तुजला।
आम्हा दर्शन दे पामरांना गा ॥१॥

कितीतरी लबाड लुच्चे लोक, गरीबाची नाही ऐकत हाक ।
अभीमान मिटवाया ये गा ॥२॥

कष्ट करुनी अन्न ना मिळे, लबाड दावतो आपले चाळे ।
आता रक्षा करण्याशी येई गा ॥३॥

अर्ज ऐकूनी लौकर यावे, दीन दुःखीयाची सेवा करावे ।
जैरामाची हाक तरी घेई गा ॥४॥

# पोवाडा

१३ (चाल : माणसा सरळ हो असा)

इथे कुणी नाही, कुणाचा गड्या, भूलतोशी वेड्या,
मायेच्या फाशामध्ये पडूनी ।
लागली तुला कशी ही मोहनी ।
करार गर्भाचा ठेवी ध्यानी ।
आता तरी लाग प्रभु भजनी रे, जी जी ॥ १ ॥

लागला धन पुत्राचा छद, मानसी आनन्द ।
सोडूनी सत्य वचनाला ।
भूलला प्रभुच्या नामाला ।
व्यवहार लबाडीचा सुरु केला ।
धनाभिमानी असशी थाटला रे, जी जी ॥ २ ॥

तूं म्हणशी स्वत:शी गुणवान, गर्वात थाटून,
शौकी फैसनी पडून ।
कधी न चालसी धर्म नीति न ।
कवडीचे नाही अंगी गुण ।
आचरण करी मुर्खा प्रमाण रे, जी जी ॥ ३ ॥

वाईट संगत मिळाली तुला, आयुष्य खोविला,
साध्य या थोड्या वेळेला ।
जैरामदास सांगे तूला ।
पाही आपला हित भला ।
नाहीतर भोगशिल यम यातनेला रे, जी जी ॥४॥

**भजन १३** (चाल : कोणीकडे पाहता.)

सोडा कूं वासना, लागली ही व्यसना, आतातरी जागानारे।
नाही तर पुढे यम यातना रे ॥धृ०॥

व्यसना पाई रंगुन गड्यारे, माणुसकीला नाडला।
म्हणोनिया व्यसना पाई, मन तुझा बाटला ॥
करा मनी विचार, व्यसनामध्ये नाही सार, मार्ग सफल कराना।
गड्यानो दृढभाव धराना रे ॥१॥

या दुर्व्यसनाचे पाई, झालासिया त्राही त्राही।
म्हणोनिया देहशिणुनी, मन बुद्धी भ्रष्ट होई ॥
नाही मिळे अन्न-वस्त्र, कैसा होऊनिया त्रस्त, फिरतोस रानोरान।
गड्यानो होई आता सावधान रे ॥२॥

जैराम सांगे तुम्हा बापा, दुर्व्यनाशी टाळा।
धर्म नितीने वागुनि बापा, संत संगी मिळा ॥
अज्ञानासी त्यागाना, एकतेने वागाना, चुकावया यातना।
गड्यानो मोक्ष मार्ग साधानारे ॥३॥

**भजन १४** (चाल : भैया मेरे राखीके.)

सोडा कपट, भाव व्हा निर्वीकाररे, तेव्हा होय नर जन्माचा उद्धार रे।
हृदयी धरा सुविचार रे ॥ धृ० ॥

हृदयी दृढ विश्वास धरावे, सर्व जिवासो एक बघावें।
प्रेमळ भावाने वागावे, संकट समयी धैर्य धरावें ॥
दुसऱ्यावर करा उपकार रे ॥ १ ॥

जगांत येवुनि कीर्ति मिळावी, अहंकाराची मति न धरावी।
दुष्ट वासना सर्व त्याजावी, मोक्षपदाची प्राप्ती करावी।
होई या जन्माचा सुधार रे ॥ २ ॥

ज्याचे जवळी द्रव्य राही, सर्व कुटूम्बी त्याचे होई ।
वेळ पडे कुणी साथ न देई, जैराम म्हणे सर्वं पैश्यापाई ॥
सर्वांचा आहे तो कर्तार रे ॥३॥

**भजन** १५ (चाल : रेशमी शलवार कुरता जालीका.)

साधू संताचा वेष घेवून उपदेश देई जमाला ।
नाच तमाशें गांजा दारू यांनी असे वाटला ॥ धृ० ॥
हॉटेलमध्ये जाऊन त्यास चहाचा आर्डर देतो ।
खारा चिवडा बिस्केट, आधी तो भक्षण करतो ॥
हातामध्ये कप घेताच, म्हणे चहा फिका झाला ॥ १ ॥
घरी स्त्रि मुलबाळ तंगी भोगती अन्नासाठी ।
याची त्यास दया नाही, त्याने बुडविले घरासी ॥
खोटे व्यसनामध्ये फसूनि कंगाल झाला ॥ २ ॥
पैसा नाही अन्नासाठी, स्त्रि फिरते दारोदार ।
केवीलवाणी मुद्रेने म्हणे भुकी आहेत पोर ॥
पैसा न कुणी दिल्याने उपवासी राहीला ॥ ३ ॥
प्रपंची ध्यान न देता आळसांत बसून राही ।
खोटया नाटया गोष्टी सांगून भोळयाना फसविन जाई ॥
पाप पुण्याचा विचार मनी नाही केला ॥४॥
जैरामदास म्हणेरे बाबा सोडा वाईट संगतीशी ।
कुमार्गाशी त्यागून, तू हाती घेई सत्यासी ॥
हातात काम घेऊन, जागवी मानव धर्माला ॥ ५ ॥

**भजन** १६ (चाल : प्रभु हा खेळ दुनियेचा.)

प्रभु माझ्या या नावेला, कधी तू पार करणार ।
अडली आहे ही भवडोही, कशी होईल ही पार ॥ धृ० ॥
नही आहे मोठी खोल, नाव होते डायाडील ।
मद मत्सर अडविती, लहरांचा मोठा जोर ॥ १ ॥

याचे पाई हि क्षिण झाली, मध्य धारी आहे अडली ।
करावे काय ? सुचेना, क्षणोक्षणी हाची विचार ॥२॥
पदोपदी आहे धोका, काळा पासोनिया रंका ।
असा तूं मार्ग दावावे, जेणेही होई भवपार ॥३॥
भक्त प्रल्हाद धृवाला, मार्ग तुने जे दावीले ।
दिले त्याना तू दर्शन, तूच सर्वांचा कर्तार ॥४॥
वरदान ऐसा दे देवा, तुझा विसर न व्हावा ।
दास जैराम म्हणे आता, धावोनी रक्षा तू कर ॥५॥

**भजन** १७ (चाल : भैय्या मेंरे राखीके)

प्रारब्धाची गती सांगावे कोणाशी ।
कर्मयोग भोगणे आले सर्वांशी ॥
सुखदु:ख प्रभुचे हाती ।धृ०।

कर्मभूमी नांव ही हीचे, कर्माचे ते फळही मिळते ।
सगळे हे, मायाचे नाते, जन्म-मरण हे कधी न चुकते ॥
ओळखी तू जन्माशी ॥१॥

इंद्रियाशी मन वशीभुत करते, मायेच्या बंधनी भुलविते ।
गारुडयाचा रंग दावीते, हया देहाचो, फजिती करते ॥
पाडे देहास भव पाषाशी ॥२॥

कर्मावर, आसक्त होवूनी, देवासी धन, पुत्र मागुनी ।
जन लोकाशी, दोष लावूनो, अहंकाराच्या नादी लागुनी ॥
मन लागे हा विषयाशी ॥३॥

साधन ऐसे, सर्व तजावे, मन मलीन हे, स्वच्छ करावे ।
इंद्रियाशी, स्वाधीन करावे, तन्मय होवूनि, हरिगुण गावे ॥
हा मार्ग ने मोक्ष पदाशी ॥४॥

कर्माचे फळ, आस सोडूनी, सुखदु:ख हे, सहन करोनी ।
सर्व चला, नीति नियमानी, जैराम सांगे, हात जोडूनी ॥
रुसू नका हो कोणाशी ॥५॥

**भजन** १८ (चाल : एक परदेशी.)

पहा गाई गुरांचे किती तरी उपकार ।
ज्यांनी जीवन सुखी केले आमचे फार ॥धृ॥
रात्रंदिवस ओझे ओढूनी झिजवितसे देहास ।
जगाच्या कल्याणार्थ, न ठेवी प्राणांची आंस ।
ज्याने केले जगावरी उपकार ॥१॥
वारसास सांभाळूनी, आम्हांसी तिने रक्षिले ।
कितीतरी हे निर्दयी, तिस म्हातारपणी विकले ।
कैसी न दया यांशी झाले हे कठोर ॥२॥
बैलावर ओझे वाहुनी, देति तुतारीचा मार ।
त्यावेळी केविलवाणी, तो तळमळतसे फार ।
किव्र आत्माची नाही स्वत:शी म्हणती हे थोर ॥३॥
गाईवरी लक्ष ठेवुनी, करा कुळांचा उद्धार ।
तेव्हा जन्म सफल होवूनी, मिळेल मोक्ष द्वार ।
जैराम म्हणे गौ सेवा करा अपार ॥४॥

**भजन** १९ (चाल : सरपे टोपी.)

या नरदेवी येवूनिया, करा जिवन उद्धार, चुकाया चौऱ्याशी ।
कोणी भूलू नका हो सोडा, खोटे हे व्यवहार चुकाया चौऱ्याशी ॥धृ॥
अनंत जन्माचे पुण्य, संग्रह झाले। तेव्हां आम्हांस नरदेह मिळाले ।
गर्भांमध्यें वचन दिले ते आठवा हो ध्यानी ॥१॥
कोटी कोटी फेरे भोगीले, एका एका योनी ।
अमूल्य ही संधी मिळाली या जन्मी येऊनी ।
सावधान? आतातरी जागा, लागा सत्‌कर्मासी ॥२॥
विकारांत राहूं नका अज्ञानाचे पायी ।
अज्ञाने हा जिवन सफल होणार नाही ।
द्वेषभाव सोडूनी ओळखा, या मानव धर्मासी ॥३॥

जैराम म्हणे करा हरिनाम चिंतन ।
खरोखर तुटेल तेव्हां भवपाश बंधन ।
आपण आलो सर्व एवढ्या करितांच या जन्मासी ।।४।।

**भजन २०** (चाल : गुरुदेव हमारा प्यारा है.)

ऐका ऐका गांवकरी लोक हो, एकमेकाच्या भागवू अटी हो ।।धृ०।।
भेद भावसी सोडूनी सगळे, आपसांत मिटवूं गावांतील झगडे ।
तेव्हां होईल सर्वांना सुख हो ।।१।।
जनसेवेंची वाटणी करुं या, गांव सुशोभित ही बनवू या ।
द्या सर्वांना सेवेंची हाक हो ।।२।।
नीति नियमाने सर्व चालावे, कामाशिवाय नाही बसून राहावे ।
मिटे अन्न वस्त्राची भूक हो ।।३।।
जैरामदास म्हणे ऐका सज्जन, देशासाठी लावा तनमन ।
कुणी करुं नका नियमाची चुक हो ।। ४ ।।

**भजन २१** (चाल : भिमरायाने सोडियेले गांव.)

किती दुर तुझे तें गांव, मला नाही ते कांही ठाव रे ।।धृ।।
षड्रिपुनी मला अडविलें, तुझ्या गांवाची वाट ।
भुललो आहो, तुझे तें नांव रे ।। १ ।।
गर्भवासी करार केला, या संकटी तूं काढ ।
मग करीन, तुझी ती धावरे ।। २ ।।
तुझ्या गावाची वाट धरली, तरण्या भवडोह ।
मार्गी पडला, आहे भेदभाव रे ।।३।।
काम क्रोध हे मागे ओढीती, निज स्वार्थाची गोडी लाविती ।
दावी मौजेचा मजला प्रभाव रे ।।४।।
जैराम म्हणे कुठें तू बसला, कुठें तुझे ते गांव ।
तुझे गांव मलातरी दाव रे ।।५।।

**भजन २२** (चाल : मनमोहन कधी येणार हो.)

कां करशी देहाचा अभिमान हो ।
पुढे काळ उभा तो पहाना ॥ धृ० ॥
लोभामध्ये करशी तू मौजा, येती नेण्या यमाच्या फौजा ।
देतील तुला ते मार हो ॥ १ ॥
आळसांत दिवस व्यर्थ गमविले, मानव जन्माचे हित ना केले ।
कोणी तरले का आळसात हो ॥ २ ॥
नाही भरवसा या श्वासाचा, क्षण भगूर हा मानवाचा ।
मानव जन्माचे सार्थक करा हो ॥ ३ ॥
धृव प्रल्हाद इहलोकी झाले, साधन साधूनी मोक्षी गेले ।
अमर करुनी ठेवीले नांव हो ॥ ४ ॥
जैराम म्हणे विचारी पाही, तरणोपाय करा लवलाही ।
सोडा सोडा देहाभिमान हो ॥ ५ ॥

**भजन २३** ( चाल : भिमरायाने सोडियेले गांव.)

किती सांगू मना जा प्रभु चरणी ।
कां हिंडतोस रानोरानी रे ॥ धृ ॥
दुर्गूण विषयी ध्यान ठेवुनी, इंद्रियासी स्वाधीन करोनी ।
टाकतो देहास चौऱ्याशी बंधनी ॥ १ ॥
आळसपण अंगी घेवूनी, रमतो लोभ मायेत ।
ही बरी नाही, तुझी चाल रैनीरे ॥ २ ॥
चंचल तुझा स्वभाव घेतो, चौ दिशेशी धांव ।
राहिना स्थिर एका ठिकाणी रे ॥ ३ ॥
कपटपणा न करी व्यवहार, देती संत ज्ञानाचा मार ।
तुज मारती ज्ञान अंकूशानी रे ॥ ४ ॥
जैरामदास म्हणेरे मना, नको हिंडू रानोरान ।
आतांचाल तू सत्त धर्मानी रे ॥ ५ ॥

भजन २४ (चाल : घटा घन घोर.)

कंठ भरुनिया येती, गरिबांची पाहुन गती, मन हे आवरेना ।
भेट तूं कधी देशी मनमोहना ॥धृ॥
दु:खी जिवाना पाहुनिया, नयनी येतो पाणी ।
किती लोक उपवासी मरती, मिळे न मूठभर दाणी ।
धीर कुणी देईना, रक्षा कुणी करिना ।
तुजविन घनश्यामा ॥ १ ॥
रात्रंदिवस कष्ट करूनी, मिळे न अन्न वस्त्र ।
पैसा नाही शिक्षण देण्या, कैसी होती साक्षर ।
याची दैना पाहून, मन येतो कळवळून ।
करतो देवा प्रार्थना ॥ २ ॥
या काळी कित्येक म्हणती, लोफरांना हुशार ।
धर्म नीतीच्या व्यक्तीस म्हणती, आहे भोंदु चोर ।
आता आली ऐसी वेळ, लोक चालतां वाईट चाल ।
कांही मज सुचेना ॥ ३ ॥
जगांत गांजा, मांस, मदीरा, यांचा व्यापार वाढला ।
दही-दूध ताक-लोणी, कितिकांनी सोडला ।
वाहवारे कैसी रीत, दुर्व्यसनाशी लावती प्रित ।
बदलला जमाना ॥ ४ ॥
ज्याची कमाई तोच आज, बनला आहे चोर ।
लपझप खोटे सांगणारा, बनतो आज सावकार ।
दुष्ट नाश करावया, भक्त उद्धारावया
येई बा राधारमणा ॥ ५ ॥
भेदासूर साऱ्या जगांत येऊनिया ठेपला ।
म्हणोनिया रोगराई यांचा प्रसार झाला ।
कांही केल्या न सम्हले बिमारी, आता आली चळवळ भारी ।
धाव म्हणती कृष्णा ॥ ६ ॥

दास जैराम म्हणे देवा, अर्ज तुजपाशीं ।
वाचवी आता भवडोही, बुडत्या जनांशीं ।
वेळ आता नको लावूं, अन्त आमचा नको पाहूं ।
येऊनी दे सांत्वना ॥७॥

**भजन** २५ (चाल : भिमरायाने साडियेले गांव)

किती गोड तुझें तें शब्द, संता ऐकून मन झाला लुब्धरे ॥धृ०॥
तुझे ते ज्ञान ऐकूनी, पडली मनावर मोहनी,
लागला तुझा मला छंद ॥१॥
वाईट संगती पायी संत, संगत केली नाही ।
कळला नाही मला कांही बोध ॥२॥
कथा पूराण नाही ऐकले, भ्रम मनाचे नाही गेले ।
अज्ञाना पायी झालो मी अन्ध ॥३॥
जैरामदास म्हणे मज गुरुदेवा, द्या आपल्या चरणी ठावा ।
तोडा अज्ञानाचा हा बंध ॥४॥

**भजन** २६ (चाल : लपवूनी ठेवसी काय राधीके.)

कोण तोडील भवपाश गुरुराया ।
तुजविण मन हें उदास ॥धृ॥
लोभ माया हे ओढूनी नेती, कूमार्गाची वाट दाविती ।
करिती आयुष्याचा नाश ॥१॥
भाग्याने नर जन्म लाभला, प्रभूशीं गर्भी करार केला ।
विसरलों त्या नेमास ॥२॥
किती दिवस मागें खोवूनि बसलो, मानव कर्तव्याशी नाही जागलो
म्हणूनी अडकलों पाशांत ॥३॥
अवगूण माझें सर्व काढूनी, मज अज्ञानाशीं ज्ञान देवूनी ।
सफल करा जन्मास ॥४॥
जैरामदास म्हणे गुरुदेवा, तुझ्या चरणाची घडो मजसेवा ।
हीच लागली आंस ॥५॥

**भजन** २७ (सारी सारी रात तेरी याद सताये.)

केव्हा भेट देशी तू भगवाना ।
आम्हा भारताच्या, दीन लेकरांना हो ॥धृ०॥
जन तारण्याशी भारतात याना, दर्शन द्यावे आम्हां पामरांना ।
तुझ्या भेटीविणा, दुःखी मी मोहना हो ॥१॥
आतातरी करावे भारतास सुखी,लोक किती राहती अन्नाविण उपाशी।
दिन दुबळयांना, तुम्ही वाचवाना हो ॥२॥
कितीतरी लुटती दीन लोकांस, कष्ट देवूनिया देती त्यांना त्रास ।
यांचा अभिमान, तुम्ही मिटवाना हो ॥३॥
कित्येकांना असती दुर्व्यसनें फार, प्रभु याचे विकार सर्व करा दूर ।
दास जैरामाची हाक तरी घ्याना हो ॥४॥

**भजन** २८ (चाल : असा कसा पावेल.)

कसा हरि मजशी तू दुरिला,
कोणता असा अपराध म्या केला ॥धृ०॥
देवा दयाळा क्षमा करावी, माझी विनवनी कानी घ्यावी ।
हीच प्रार्थना तुजला ॥१॥
अति पतीत मी मुढ आहे अन्त माझे तू कुठवरी पाहे ।
येई तूं ज्ञान देण्याला ॥२॥
तुझ्या मुरलीची ध्वनीं दे कानीं, तीने पडो या मनावर मोहनी ।
लागो तुझा छद गोपाळा ॥३॥
किती भक्तांचा उद्धार केला, गणिका वश्याला मार्ग दाविला ।
नेले तूं निज धामाला ॥४॥
जैराम तुजविण उदासी, विसरुं नको या पामराशीं ।
ये तूं धीर देण्याला ॥५॥

**भजन** २९ (चाल : मुझे प्यारा भारत मेरा.)

जगी आहेत सत्तधारी संत ।। धृ० ।।

त्यांचे प्रतापे चाले जग, म्हणून असे पुण्य सत् ।। १ ।।

दिवसरात्र असती दुखियासाठी, प्रपंच करुन करती परमार्थ ।।२।।

दुर्व्यसनातून दूर राहूनी, तत्पर असती सेवेंत ।। ३ ।।

स्वार्थासाठी द्रव्य न घेती, जगहित तो आपला हीत ।।४।।

सुख दु:खाना समान मानती, मार्ग सत्याचा दावितात ।।५।।

मान अपमान नाही अंगी, माती सोना एक बघतात ।।६।।

आत्म सेवा हेच भजन, सदा राही मग्न यांत ।। ७ ।।

जैराम म्हणे यांचे लक्षण, कोणा नकळे यांचा अन्त ।। ८ ।।

**भजन** ३० (चाल : अवताराचे कार्य कराया.)

जगांत व।ढली बेकारी किती, द्या याकडे ध्यान हो ।।धृ०।।

आळसांत हे बसून राहती, लपझप खोटया गोष्टी सांगती ।
थोडे तरी काम न करती, खोवती इस्टेट सारी हो ।।१।।

दुर्व्यसनात यांचे मन, मानव कर्तव्ये गेले भुलून ।
धर्म नीति यानी सोडली, वागती भलत्या रितीनें हो ।।२।।

शान शौकत यांनी वाढविली, पैसा नाही हातांत ।
असत्याला सत्य सांगूनी, खोविला यांनी इमान हो ।।३।।

आल्या जन्माचें हित सोडूनी, रमती लोभ मायेंत ।
मागे पुढचा विचार न करती, पाप अती घनघोर हो ।।४।।

जैराम सांगे सर्व बांधवाना, बेकारी पासून दूर रहाना ।
आल्या जन्माचे सार्थक होईल, गोष्ट खरी ही माना हो ।।५।।

**भजन ३१** (चाल : दाने दाने पे लिखा है.)

जन तरण्याशीं होत असे संताचे अवतार ।
लोका सांगताती करा, तुम्ही सत्याचा व्यवहार ।। धृ० ।।
प्रपंची भुलल्या लोकांस, मार्गाशी लावूनी ।
त्याचे अवगुण विकार सर्व ही हरोनी ।।
तत्काळ करून देती, मानव जन्माचा उद्धार ।। १ ।।
सांगताती लोकांस दुर्व्यसनाशीं सोडा ।
प्रेमभावें चाला अहंकाराशी मोडा ।
तेव्हा व्हाल तुम्ही भव सागरांतूनी पार ।। २ ।।
आलीया जन्माचे सार्थक तुम्ही करा ।
तेव्हा मिळे तुम्हां मोक्षाचिये द्वारा ।
अमोलिक वेळ आहे, खोवूं नका बेकार ।। ३ ।।
जैरामदास सांगे संत समदृष्टी पाहती ।
अज्ञानी लोकांची ते काढताती भ्रांती ।
देह झिजवूनी करती, सर्वांवर उपकार ।। ४ ।।

**भजन ३२** ( चाल : कोणीकडे पाहता.)

उठा उठा सज्जन जन, गरिबासी न मिळे अन्न,
लोक गेले त्रासून, गड्या हो आतातरी जागाना हो ।।धृ०।।
कष्ट करूनी गरिबासी भरपोट मिळे न अन्न ।
दु:खे भोगती मूलबाळ, पाहे नेत्र उघडून ।
गरिबाच्या सेवेशीं, लागा कांही कार्याशी,
आळसाला त्यागाना हो ।। १ ।।
धन द्रव्याचा गर्व करोनि, भूलूं नका गरिबास ।
आलिया नर जन्माचें, नका करू तुम्हीनाश ।
ठेवा प्रभुवर विश्वास, तेव्हा चुकेल यमपाश,
गड्या हो जनसेवेशी लागाना हो ।।२।।

कित्येकांना लाभले, दुर्व्यसनांसे साधन ।
म्हणोनिया मुकले रे, प्रभुचिया भजन ।
अज्ञानी मानवाना, सत्यमार्ग दाखवाना,
गड्या सुख मिळे सर्वांना हो ॥ ३ ॥

जैरामदास म्हणे बाप हो, झटा परमार्थासाठी।
तेव्हा तुम्हांसी होईल रे, मोक्षाचिये प्राप्ती।
आता करी आठवण, मग चुके यम बंधन,
गड्या हो हेची संत वचना हो ॥ ४ ॥

**भजन ३३** (चाल : कोणीकडे पाहता.)

ऊठा ऊठा सज्जना, अज्ञानाचा सोडा बिछाना सत्मार्गी लागाना हो ।
गड्यांनो आळसाला त्यागाना हो ॥धृ०॥

पहाटेस उठोनिया स्वच्छ करा घरदार ।
त्याने तुमचे सर्व रोग पडतील दूर ।
हाती काम मुखीं राम, तेव्हा होईल तरण,
आतातरी जागाना हो ॥ १ ॥

आंघोळीच्या तद नंतरी करा प्रभुचे ध्यान ।
मानव नीति ओळखुनिया, शुद्ध करा मन ।
जागा आतां गांवकरी, तेव्हां होईल भक्ती खरी,
प्रेमभाव जोडाना हो ॥ २ ॥

मनासिया स्थिर करोनी, ओळखी आत्माराम ।
अश्या रितीने होई मार्ग तुमचा सुगम ।
चचल मना करा स्थिर, कांही धरा थोडी धिर,
तुटती पाप बंधना हो ॥ ३ ॥

**भजन** ३४ (चाल : कुठतरी भोगसी मौजा.)

गड्या मागे पुढे पाहून चालगा ।
समोर टपून उभा आहे काळ गा ।।धृ० ।
चहूं दिशांना वेडा घालून, चोर आहे टपले ।
मोह मायेच्या फाशांत, कां कसे गुंतले ।
अज्ञानाशीं आता जाळगा ।। १ ।।
किती दिवस खोवून बसला, आतातरी जाग गा ।
मानव कर्तव्याशी भुलला, आतातरी लाग गा ।
भवडोही कसा होशी पार गा ।। २ ।।
सर्पा तोंडी बेडूक असून, ओरडून म्हणे मी शहाणे ।
तसें तुझे रे मानवा. आहे जन्मचे गऱ्हाने ।
पाप पुण्याचे तुज मिळेल फळ गा ।। ३ ।।
पुर्व पुण्याने नरदेह मिळाला, आयुष्य खोवून बसला ।
नीति धर्मानें चाल गड्या रे, नाहीतर धर्म बुडाला ।
आता उरली आहे थोड़ी वेळगा ।। ४ ।।
जैरामाची प्रार्थना आहे, सर्व आईबापांन। ।
प्रपंच साधून परमार्थ करावा, हाच धर्म मानाना ।
हेच खरे नियम पाळगा ।। ५ ।।

**भजन** ३५ (चाल : दिल मनसे गाऊंगा तेरा भजन.)

गरिबाच्या वाली तूं कां? अंत बघशी ।
कशी नये दया, दुरुन नवल पाहशी ।। धृ० ।।
कष्ट करोनी शिणली, आमची हाडे ।
अन्न वस्त्राचे घरी, पडती दरोड़े ।
लोभी लोक मारती, अहंकारी कोड़े ।
दीनाची हाक कां कानी न घेसी ।। १ ।।

राहण्याशी घरदार, पडली झोपडी ।
दुरूस्ती करण्यास नाही, पैसा नी कवडी ।
देवा आता काय करूं, अशी झाली नासाडी ।
भरून येते कंठ, धीर नाही मनाशी ॥२॥
एक बाजूने आहे, गुंडयाचा जोर ।
कितिक फैलाविती, काळा बाजार ।
आम्ही गरीब झालो, यांनी बेजार ।
ना मिळे अन्न राहतो उपवासी ॥३॥
बदललि वेळ आता, आली उलटी चाल ।
ज्याची कमाई त्यांचे, आज होती हाल ।
गुंडे लोक आज पहा, करती कमाल ।
जैराम म्हणे यावे, देवा रक्षा करण्याशी ॥४॥

भजन ३६ (चाल : प्रभु हा खेळ दुनियेचा.)

गडया कां तूच हससीरे, दशा गरिबाची पाहून ।
न जाणे कोण दिवशी तो, होईल रे रंक धनवान ॥धृ०॥
स्वत:शी उच्च समजोनी, कुणाला दोषी कां बघशी ।
संचिती जे असे लिहले, कधी न ते चुकती कोणाशी ।
श्रीमंती थाट दावून, कां म्हणशी मीच गुणवान ॥१॥
किती पतित होता तो वाल्या, वाल्याचा वाल्मीक झाला ।
अजामीळ हा किती पापी, प्रभुनामी मोक्षी गेला ।
पुण्याचे काम करण्याला, आला तूं जन्म घेवून ॥२॥
नको विसरूं रे तूं आता, प्रभुच्या गोड नामाला ।
गर्भाची आठवण करी तूं, सोड या मोह छंदाला ।
जे करणे आहे तें कररे, वेळ जाईल ही निघून ॥३॥
कुटूंब परिवार हे म्हणतो, हितासाठी माझा माझा ।
वेळ पडे जेव्हां तुजवरती, तेव्हां कोणी साथ न दे साजा ।
मोह मायेची सोड गोडी, पुढे चौऱ्याशी बंधन ॥४॥

दास जैराम म्हणे मोहन, इथे पाप पुण्य जे करती ।
कर्माने संचित बनती, तशी त्यांची होई गती ।
चौऱ्याशी बंधन चुकवाया, करी नित्य प्रभु भजन ।। ५ ।।

**भजन ३७** ( चाल : गुरुदेव हमारा प्यारा.)

आला पंधरा आगष्ट दिवस गड्यांनो, मनी मानू उल्हास ।।धृ०।।
गुलाम गिरीची बेडी तुटली, आशा तृप्त आमची झाली ।
मिटला भारताचा त्रास ।। १।।
स्वातंत्र्याचा दीप उजळला, अज्ञानाचा नाश झाला ।
सर्व मिळून लागू सेवेस ।। २ ।।
भेद भावना दूर करोनी, तिरंगी झेंडा हाती घेऊनी ।
मिटवू लबाड अहंकारास ।। ३ ।।
चरखा टकळी हाती घेऊनी, काढू सूत सर्व मिळूनी ।
वस्त्र पुरवू आम्ही गरिबांस ।। ४ ।।
बापुजींचे अहिंसा मंत्र, याने देश केले स्वतंत्र ।
सर्व पाळू त्या नियमास ।। ५ ।।
बापूजींचे हेची मंत्र, सदा राहो आमच्या हृदयांत ।
जैराम म्हणे येईल कामास ।। ६ ।।

**भजन ३८** (चाल : सारी सारी रात तेरी.)

चित्त शुद्ध करोनी, प्रभु ध्यानी बसावे ।
तन--मन--धन गुरु चरणी अर्पावे रे ।। धृ० ।।
लोभ अहंकाराशी त्यागून द्यावे, प्रभु भजनात मन वळवावे ।
हृदयी प्रभुचे नाम चिंतावे रे।। १ ।।
प्रभु भक्तींत सृती तार लावावी, समोर मग सद्गुरुची मूर्ति पहावी ।
चार अवस्थेंत गुरु स्वरुप पहावे रे ।। २ ।।

सत्य गुण त्याचे आत्मी पहावे, साक्षी अंतरी बाहर घ्यावे।
ऐशा साधनानी प्रभू चरण बघावे रे ॥३॥
ऐसे सोपे वैराग्याचे साधन बरवे, प्रपंच साधुन प्रभु भजन करावे।
जैराम म्हणें यानेच, प्रभु दर्शन घ्यावे रे ॥४॥

**भजन ३९** (चाल : सारी सारी रात तेरी.)

चला आईबापा जाऊं पंढरपुराशी।
विठ्ठलाची भेट घेवूं चुकाया चौऱ्याशी हो ॥धृ॥
पंढरपुराची महिमा अपार, विठ्ठलाचे दर्शनाने दुःखें होती दूर।
किती लोक आवडीने जाती पंढरीसी हो ॥१॥
पंढरपुराशी असे चंद्रभागे वेढ़ा, विठेवरी उभा सावळा तो भोळा।
आवडीने लोक जाती, पंढरपूराशी हो ॥२॥
आषाढी एकादशी यात्रा मोठी फार, हरिच्या नामाचा तिथे होत असे गजर
जन्म सफल करण्या, जावे पंढरीशी हो ॥३॥
गावो गावाहुनी संत लोक येती, पंधरा दिवसाची वारी देव दर्शन घेती।
तिर्थे घेऊनिया फिरती घराशी हो ॥४॥
दास जैराम म्हणे आलीया जन्माशी, एक वारी करा तरण्या भव सागराशी
भुलूं नका कोणी पंढरी जाण्याशी हो ॥५॥

**भजन ४०** (चाल : तेरे प्यारका.)

झोपेमध्यें दिवस कां ? तुरे घालवीशी।
चल उठ जाग आतां, अवतार कार्याशी ॥ धृ. ॥
मोह मायेच्या पाई लुप्त संसारात, जगजेठी नाहि एक क्षण आठवत
नाश केले बहुमोल, मानव जन्माशी ॥ १ ॥
खोटे पणाचा तूं, व्यवहार करशी, गर्वाभिमानी, तूं रे थाटलासी
कप द्वेष भाव आपुले, मनामध्यें ठेवशी ॥ २ ॥

धर्मग्रंथ पूर्वजांचे, वचन न पाळशी; निति नियम सोडूनिया झाला
यांत सर्व खोवूनि बसला, सत्य धर्माशी ॥३॥ (सिया आळशी
ज्यासाठी आलासी तूं, जन्म घेवून; त्यासाठी लवलाही दे आतां ध्यान
जैरामाची विनवणी, आतां तरी मानशी ॥ ४ ॥

**भजन ४१ (चाल : समुदाय प्रार्थनेची किती)**

चला सर्व मिळूनी मानू २६ जनवरीला ।
याच दिवशी अमुचा भारत स्वतंत्र झाला ॥ धृ० ॥
ग्राम स्वच्छ ठेवूनी, तोरणें उभारुनी ।
रांगोळी घालूनिया दीप रत्ने उजाळोनी ।
मनो भावें सर्व पाळू गणराज्य दिवसाला ॥ १ ॥
आज पासूनिया एक दुसऱ्याचे कष्ट भागवूं ।
प्रेममतें सर्व राहूं, भेदभावाशीं सर्व मिटवू ।
हा मंत्र नित्य गावू, सर्वांस तारण्याला ॥ २ ॥
सदा आमच्या हृदयी राहो, दया, क्षमा, शान्ती ।
तेव्हां मिटेल सर्व अज्ञानतेची भ्रांती ।
सत्यतेची ज्योत लावून, मिटवूं या गुंडगिरीला ॥ ३ ॥
कुणी जरी आळसी असेल, त्याशीं लावावे कामास ।
तेव्हा मिटेल आमुची, अन्न वस्त्रांची आंस ।
जैराम सांगे सर्वा, अहिंसा मंत्र तारण्याला ॥ ४ ॥

**भजन ४२ (चाल : दिल मनसे गाऊंगा तेरा भजन.)**

आईबापा विनवणी ही अशी, त्यागूं चला दुर्व्यनाशीं ॥ धृ० ॥
आईचिया पोटी जन्म आमचा झाला ।
दुध हा व्यसन एक, होता आम्हांला ।
सगतीने लागलो दुव्यनाशीं ॥ १ ॥

जैसी जैसी आम्हा संगती मिळाली ।
तैसी तैसी आम्हां, सेवाहि घडली ।
मायेंत भुललो दुर्व्यसना पायी ॥ २ ॥
ग्रहणी जैसे अन्न तैसे होई मन ।
तैसेची गुण देई नारायण ।
त्यागू आपण वाईट संगतीशी ॥ ३ ॥
अन्तकाळी आम्हां, अन्न दुध फळ ।
मानवांसाठी हेची साधन खरं ।
या साधने इंद्रिये होती बसी ॥ ४ ॥
दुर्व्यसन त्यागून करी जो साधन ।
पुन्हा नाही त्यासी भव बंधन ।
जैराम म्हणे मग मिळे जिवन मुक्ती ॥ ५ ॥

**भजन ४३ (चाल : मनमोहन कधी येणार हो.)**

असा कसा हरी तूं रुसला गा, कुठे जाऊनिया तूं बसला ॥धृ॥
माता यशोदा तुला पहाती, गोप गोपीका तुला वहाती ।
तू धावत येई आता गा, माझ्या तान्हुल्या ॥ १ ॥
गाई गुरे चहुंदिशी पाहती, दिनरात्र तुझ्या आरोळ्या घेती ।
कुठे गेला तूं आता पालनवाला रे, दुःख होते जीवाला ॥२॥
भक्त लोक तुझी वाट पाहती, चातकाप्रमाणे टक लाविती ।
सुदर्शन घेऊन येई आतां रे, आमची रक्षा करण्याला ॥३॥
दीन दुबळे हें दुःखीजन, त्राही त्राही झालें, तुझ्याविण ।
गेला कुठे तूं आतारे, धाव घेई नंदलाला ॥४॥
जैरामदासाची ही विनवणी, धावत येगा तूं चक्रपाणी ।
तुजविण नाही चैन मनी रे, जिवाच्या जिवलगा ॥५॥

**भजन** ४४ (चाल : बापूका पुण्य विमान.)

आईबापा ऐका ही हाक, मनी ठेवा धाक, प्रभु देवाचा ।
नाही मान वाईट चालीचा ॥धृ०॥
जो कुणी मुलीचे पैसे घेई पाप वसे त्याचे डोई ।
जगी नाही त्याचा मान, होते हैरान ।
भागी पापाचा ॥१॥
जेव्हां सासरी मुलगी गेली, अन्न वस्त्राची सोय ना झाली ।
सासूबाईस बोले प्रेमाने, द्यावे अन्नदाने ।
भूकेची वेळ आता ॥२॥
तेव्हां सासू बोले सूनेस, द्रव्ये दिले तुझ्या बापास ।
म्हणून आली गरीबा घरी, करावी मजूरी ।
भोग पित्याचा ॥३॥
ऐकूनिया सुन ती रडली, पश्चातापाने व्याकुळ झाली ।
देई शाप आई बापास, होईल तुमचा नाश ।
दु:खी आत्म्याचा ॥४॥
पैसे घेऊन झाल्या सावकार, अन्न वस्त्राने मी बेजार ।
माझ्या आत्म्याची पुकार, होणार नाही बरं ।
द्वार नर्काचा ॥५॥
जैराम म्हणे ऐका आईबापा, पैसे कन्येचे घेऊ नका ।
ही पाप वाटेची चाल, सोडा तत्काळ ।
घ्या मार्ग सत्याचा ॥६॥

**भजन** ४५ (चाल : ये मर्द बड़े दिल दर्द बड़े)

भक्ती त्यागी कुमार्गी लागी, सत्याचा कंटाळा ।
आपल्याच सारिखा हा बघतो जगाला ॥धृ०॥
कू वासनेत ठेवी नित्य मनाला ।
स्थिरता नाही थोडी या चोराला ।
जड बुद्धीच्या मते होवूनी, त्रास देई स्वजनाला ॥१॥

गोड गोष्टी सांगून लोकांना भ्रमवितीं ।
बरपांगी मोठे भोळे अंतरीकाळे असती ।
पैशासाठी अब्रू विकूनी, म्हणे शहाणा स्वत:ला ॥२॥

असत्याशी सत्य सांगून करितसे चाळे ।
माणुसकीचे गुण नाही अंगी याचे थोडे ।
दुर रहावे ऐशापासून जैराम सांगे तुम्हाला ॥३॥

**भजन ४६** (चाल : अवताराचे कार्य कराया.)

भारत भूच्या वासीयांनो, मनी आठवा त्या महात्म्यास ॥धृ०॥
देश ज्याने स्वतंत्र केला, गुलामगिरीचा पाश तोडला ।
राञदिवस झटूनी हरिला भारताचा त्रास ॥१॥

तिरंगी झेंडा हाती घेवोनि, सत्य अहिंसा नारा लावूनी ।
न्याय न्यायाने स्वातंत्रता, मिळविली पंधरा आगष्टास ॥२॥

भारताच्या जन सुखेसाठी, फिरोनिया देशोदेशी ।
सकटे त्यांनी किती साहिली, पण सेवेमध्ये उल्हास ॥३॥

सर्वा सांगतसे मंत्र खरा, सत्य अहिंसा हाच नारा ।
प्रेमभावाने वागूनी सगळे, सर्वं लागा देश सेवेस ॥४॥

चरखा टकळी हाती घेऊनी, सत्याचा ते उपदेश देती ।
अहंकाराची मिटवोनिया, करि जागृत मानव धर्मास ॥५॥

ज्याने भारतावर उपकार केला, त्यावर दुष्टाने गोळया झाडील्या ।
कितीतरी कठोर हृदयाचा तो दया नाही तिळमात्र त्यास ॥६॥

रक्ताची जेव्हां धार लागली, रामनामाची धून उमटली ।
अंत:करणांतून आशिर्वाद दिला, बापूजीनें त्या दुष्टास ॥७॥

बापूजींचे नियम जो पाळेल, मानव जन्म सफल होईल ।
सदा राहो हेच ध्यान, असा ध्यास दे जैरामास ॥८॥

**भजन** ४७ (चाल : सरपे टोपी लाल.)

खोवली मानवतेची चाल, याने देश झाला टंगाल,
तरी कोणी ऐकेना,
पहा पहा जातसे मान, द्या जरा ध्यान, हितासाठी कष्टांना ।।धृ०।।
देशाचे हे हाल पहाता, अंतरी दुःख होते ।
कितीकांना वाटते देश केव्हां सुखी होते ।
ही हाक आहे देशाची, लागा कामाशी ।। १ ।।
साधूसंत देशभक्त, झटती देशासाठी ।
रात्रंदिवस दुःख भोगोनी, फिरती देशोदेशी ।
सत्याचे सांगती हाल, सोडा दुर्व्यसनाची चाल ।। २ ।।
गुंडगिरी लबाडखोरी, दावति आपले थोरपणा ।
लुटोनिया दिन दुबळयांना, सांगती आपला शहाणपणा ।
वाहवारे यांचीही चाल, दीन दुबळयांचा लुटला माल ।। ३ ।।
सर्वांचा वाली बापा, आता कुठ जाऊन लपला ।
कशी नाही दया तुजला, कसा कठोर तूं झाला ।
जैराम म्हणे झाले बेहाल, वांचवी कूकर्मांची चाल ।। ४ ।।

**भजन** ४८ (चाल : झाला महार पंढरीनाथ.)

नाही मागणे धन द्रव्याशी, विनवितो प्रभु तुम्हासी हो ।।धृ०।।
तुझ्या भेटीची आहे चिंता, भक्तासाठी धावत ये आता ।
तू दिन दुबळयांचा दाता, माधवा केव्हां भेट देशी ।। १ ।।
मज मन नेतो विषयांत, याने भुलविला प्रपंचांत ।
कसे याने फिरविले मत, मन ठेवी आपुले पाशी ।। २ ।।
मन माझे आवरत नाही, नेतो सदा पाप डोही ।
मायामध्ये नित्य मोही, म्हणून भोगा आले चौऱ्याशी ।। ३ ।।
देवा तुजविण, मला नाही शांती, पडली आहे सगळी भ्रांती ।
करणे धरणे, सर्व तुजपाशी मज दर्शन दे पामराशी ।। ४ ।।
जैराम म्हणे जगजेठी एक वेळ तारि या दिनाशी ।
प्रार्थना हीच तुजपाशी, संकटी साह्य तू होशी ।। ५ ।।

**भजन ४९ (चाल : डग मग डोले माझी)**

असे ज्याचे मनी, हरि नामाचा छंद ।
व्यापक सर्व ठायी, विठ्ठल गोविन्द ।। धृ० ।।

दया बहु असे नित्य ज्याचे हृदयी ।
राग द्वेष अंगी तिळ मात्रचि नाही ।।
परोपकाराचा असे नेहमी नाद ।। १ ।।

संकटे जे कांहि यांचे वरति येती ।
आनंदाने ते सोसती ।।
दृढभाव धरूनि, भजि परमानंद ।। २ ।।

देवाचिया चरणी अर्पुनि देह ।
सर्व जिवावरी, दया प्रेम भाव ।।
असत्य कामाचा हा, करि प्रबंध ।। ३ ।।

परक्याचे द्रव्य पाहि माती समान ।
प्रभु नामाचा रात्रंदिवस राहि ध्यान ।।
खान पान मान याची नाही सुद ।।४।।

जैरामदास म्हणे ज्यांचे, अंगी हे गुण ।
अमर किर्ती ठेवून, जाती जगातून ।।
जिवंतपणी घेती मुक्ती पदाचा आनंद ।। ५ ।।

# -: आरती :-

(चाल : आरती ज्ञानराजा.)

आरती सद्‌गुरुनाथा, तुमच्या चरणी राहो माथा ।
बुडलो या भवडोही, मार्ग दावा मज आता ॥ धृ० ॥

भक्त तारण्यासाठी, तुम्ही घेतां अवतार ।
अज्ञानासी ज्ञान देऊनी, तुम्ही केले भवपार ॥ १ ॥

मोहमाया सोडूनी, करता नामाचा गजर ।
ऐकोनिया नाम, काल कापतो थरथर ॥ २ ॥

सोडोनि घरदार, नित्य परमार्थ व्यवहार ।
किती वर्णू गुरुदेवा, काय मी पामर ॥ ३ ॥

तुमचिया कृपेने, तुटती प्रपंच बंधन ।
चुकले आहेत वर्म, मार्ग दावो सूगम ॥ ४ ॥

विनवनी जैरामाची, ऐकावी श्रीनाथा ।
आलो शरणागत, चुकवा हा फासा ॥ ५ ॥

समाप्त